पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

दिनांक - **२१/१०/२०१५** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२१/१०/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सौ.स्वाती प्रमोद साने - सभापती**
२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
३. मा.जाधव साधना रामदास
४. मा.चोंधे आरती सुरेश
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.दंडवते - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.रत्नपारखी – कार्यकारी अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) प्रभाग क्र.४१ मधील व्यायामशाळेकरीता असलेली आर्थिक तरतूद टॉयलेट ब्लॉक बांधणेकामी वर्गीकरण करणेबाबत – मा.आरती चोंधे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) मागासवर्गीय युवकांना प्रशिक्षण देणे ही योजना झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागामार्फत राबविणेबाबत – मा.अमिना पानसरे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) सभा आयोजनाबाबत – मा.अमिना पानसरे, मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव.

----------

**अ)** दिनांक ०३/०६/२०१५, ०९/०६/२०१५, १७/०६/२०१५, ०१/०७/२०१५ व १५/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २०)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**आ)** दिनांक १७/०६/२०१५, ०१/०७/२०१५, १५/०७/२०१५, २४/०७/२०१५, २९/०७/२०१५ व ३१/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २१)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**इ)** दिनांक १५/०७/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २२)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**ई)** दिनांक १४/०९/२०१५ रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**उ)** दिनांक ०७/१०/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – २५ विषय क्रमांक – ०१

दिनांक – २१/१०/२०१५ विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.साधना जाधव

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५

विषय - पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै.मधील २४ व १२ मी. रुंद (पूर्व-पश्चिम) रस्त्याचे भूसंपादनाबाबत...

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २६ विषय क्रमांक – ०२

दिनांक – २१/१०/२०१५ विभाग – नगररचना व विकास

सुचक – मा.आरती चौंधे अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिं.गुरव/टे-८/६८८६/२०१५, दि.०१/१०/२०१५

विषय - मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.७९ पैकी व ८० पैकी जागेत आरक्षण क्र.३५६, “ प्राथमिक शाळा विस्तार ” चे जमिनीचे भूसंपादन करणेबाबत ...

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २७ विषय क्रमांक – ०३

दिनांक – २१/१०/२०१५

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.साधना जाधव

संदर्भ – मा.आरती चोंधे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.४१ गांधीनगर भागात व्यायामशाळा बांधणेकामी सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकीय लेखाशिर्षामध्ये र.रु.१० लाखाची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. अद्याप व्यायामशाळेचे काम आवश्यक नसल्याने या कामाऐवजी प्रभागामध्ये तातडीची निकड लक्षात घेता टॉयलेट ब्लॉकची नागरिकांना अत्यंत आवश्यकता आहे. याकरीता नव्याने संडासब्लॉक बांधणेकामी ही रक्कम वर्गीकरण करुन टॉयलेट ब्लॉक बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २८ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २१/१०/२०१५

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.साधना जाधव

संदर्भ – मा.अमिना पानसरे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहरातील मागासवर्गीय युवकांना व्यवसाय प्रशिक्षण देणे ही योजना सद्यस्थितीत नागरवस्ती विभागाकडे आहे. परंतु शहरातील मागासवर्गीय युवकांचे कल्याण व विकास करणे ही बाब झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाशी संबंधीत असल्याने सदरची योजना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागामार्फत राबविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९ विषय क्रमांक – ०५

दिनांक – २१/१०/२०१५

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अमिना पानसरे, मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव –

मा.शहर सुधारणा समिती सभेची पाक्षिक सभा प्रत्येक महिन्याच्या १ल्या व ३ –या बुधवारी दुपारी ३.०० वाजता भरविणे ऐवजी प्रत्येक महिन्याच्या १ ल्या व ३ –या मंगळवारी दुपारी ३.०० वाजता भरविण्यात यावी. तथापि सदर दिवशी कार्यालयास सुट्टी / सुट्टया असलेस त्या सुट्टी / सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी दुपारी ३.०० वा. सभा भरविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सौ.स्वाती प्रमोद साने )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७४३/२०१५
दिनांक : २३/१०/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Shahar Sudharna Samitee Proceeding 3 doc.